REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
UGC APPROVED JOURNAL NO. 48514
VOLUME - 8 | ISSUE - 9 | JUNE - 2019

# "सातपुडा पर्वतरांगांतील आदिवासींचे धार्मिक जीवन"

डॉ. विवेकानंद लक्ष्मण चव्हाण
इतिहास–विभाग , एस.पी.डी.एम.महाविद्यालय,शिरपूरजि.धूळे

## प्रस्तावना :



खानदेशाला प्राचीन काळापासून महत्व आहे दिसून येते.रामायण, महाभारतकालीन ऋषीक प्रदेश हाच 'खानदेश' असावा असा विचार काही विद्वानांनी मांडलेला आहे.अजिंठा येथील लेणी क्र.१६ मधील शिलालेखातील तपशिलात 'ऋषिक' प्रदेशांचा उल्लेख आहे.मुसलमानपूर्व काळात खानदेशाला 'कन्नदेश' या नावाने ओळखला जाई. कन्नदेश म्हणजे 'कृष्णाचा देश' असे मत काही अभ्यासकांनी व्यक्त केले आहे.कन्हदेश, कान्हदेश, कहनदेश व खानदेश अशा परंपरेने अपभ्रंश होत गेला.सन १९०६ मध्ये खानदेश जिल्हयाचे पूर्व खानदेश आणि पश्चिम खानदेश असे विभाजन झाले.पूर्व खानदेशचे जळगांव व पश्चिम खानदेशचे मुख्यालय धुळे येथे ठेवण्यात आले.पुढे सन १९६० मध्ये पूर्व खानदेश ऐवजी जळगांव जिल्हा आणि पश्चिम खानेदश ऐवजी धुळे जिल्हा असे नामाभिधान करण्यात आले.सन १९९८ मध्ये धुळे जिल्हयापासून स्वतंत्र नंदूरबार जिल्हा निर्माण झाला. आजच्या धुळे, नंदुरबार आणि जळगाव जिल्ह्याच्या भूप्रदेशाला 'खानदेश' असे म्हटले जाते.

खानदेशच्या उत्तरेला सातपुडापर्वताची रांग आहे.हा पर्वत महाराष्ट्राच्या उत्तर सीमेवरुन पूर्व-पश्चिम अशी पसरलेली आहे.या पर्वताच्या रांगा गुजरातमधील राजपिपला, सागबारा टेकडयांपासून सुरू होतात.अक्राणी तालुक्यात या पर्वतरांगाना अक्राणीच्या टेकडया म्हणतात तर पूर्वेस जळगाव जिल्हयातील पूर्णा नदीच्या उत्तरेकडील डोंगरांना हत्ती डोंगर म्हणतात.महाराष्ट्रात एकूण ४७ आदिवासी जमाती आढळतात.खानदेशात भिल्ल, पावरा, कोकणी, मावची, गामित, गावीत, नाईकडा, कोटले, धानका, राठवा, पारधी, तडवी भिल्ल, वसावा इत्यादी जमातींचे वास्तव्य आहे.सातपुडा पर्वतात या जमातींचे वास्तव्य मोठया संख्येने दिसून येते.त्यांची स्वतंत्र संस्कृती आहे स्वतंत्र बोलीभाषा असून देखील त्यांच्यात सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक व धार्मिक विधीत समानता दिसून येते.

खानदेशच्या इतिहासावर झालेल्या संशोधनाचा आढावा घेतला असता आजपर्यंत सातपुडयातील आदिवासी जमातींविषयी संशोधन झाल्याचे आढळत नाही. इतिहासाच्या संशोधनात्मक अभ्यास करीत असतांना फक्त राजकीय दृष्टीनेच इतिहास परिपूर्ण होत नाही, त्यासाठी विविध जाती-जमाती, त्याचा भौगोलिक, सामाजिक, आर्थिक, धार्मिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक इत्यादी इतिहासाच्या विविध पैलूंचा अभ्यास होणे आवश्यक आहे. समाजाच्या व राष्ट्राच्या व्यापक विकास प्रक्रियेचा विचार करतांना आदिवासी विकासाबाबत विचार होऊन त्यांचे अध्ययन, संशोधन होणे गरजेचे झाले आहे.'आदिवासी लोक' हे समाजातील दूर्बल व दुर्लक्षित घटक आहे.

विषय निवड **-आदिवासी लोक मेहनती, प्रामाणिक, दयाळू, आदरातिथ्य करणारे, सहसा अनोळखी माणसांशी न बोलणारे, परंतु परिचयानंतर मोकळेपणाने वागतांना दिसतात. हे लोक अनादीकाळापासून टोळयाटोळयाने आपआपल्या जीवनपध्दतीनुसार दऱ्या खोऱ्यातून राहत**

आलेले आहेत.ते जमातीनुसार समूह करून राहतात.सातपुडयात वास्तव करणाऱ्या आदिवासी जमातीचा स्थूलमानाने संशोधन करण्यासाठी "खानदेश परिसरातील सातपुडापर्वत रांगांतील **आदिवासींचे धार्मिक जीवन**" ह्या विषय निवडलेला आहे.

## संशोधनाची आवश्यकता व महत्व :-

**सातपुडा पर्वतरांगामध्ये वास्तव्य करणाऱ्या आदिवासी जमातींचा स्वातंत्र्योत्तर काळातही सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक विकास झालेला नाही. ते आजही मागासलेले आढळतात.या जमातींच्या विकासासाठी संशोधनाची आवश्यकता आहे.खानदेश परिसरातील आदिवासी जमातींच्या ऐतिहासिक कामगिरीचा बोध व्हावा त्यांची धार्मिक कल्पना** व **सांस्कृतिक ठेवा यांचे महत्व लक्षात घेऊन सातपुडयातील आदिवासी** जमातींचे धार्मिक जीवन **या घटकांवर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केलेला आहे.**

## संशोधनाची उद्दिष्टयै -

प्रस्तूत संशोधकाने 'सातपुडापर्वतरांगातील **आदिवासींचेधार्मिक जीवन**'या विषयावर लक्ष केंद्रित ठेवून संशोधन केलेले आहे.

१)आदिवासी जमातीच्या **धार्मिक जीवनाचा** शोध घेणे.

२)आदिवासी जमातीच्या सांस्कृतिक एकात्मतेचा शोध घेणे.

## संशोधनाची गृहितके -

संशोधनाचे संभाव्य उत्तर शोधण्यासाठी **खालील** गृहितके ठरविलेली आहे.

१) आदिवासी समाजातील सुशिक्षित लोकसमूह आपली संस्कृती, रुढी-परंपरा यांची जोपासना करीत आहे.

२) निसर्ग देवतांवर, भूताखेतांवर, मंत्र-तंत्रावर त्यांची दृढ-श्रध्दा आहे. तेच त्यांनी आपले धर्मजीवन मानलेले आहे.

## संशोधनपद्धती :-

**प्रस्तूत संशोधन ऐतिहासिक प्रसंगाशी व** धार्मिक जीवनाशी **संबधित आहे म्हणून संशोधनातील ऐतिहासिक आणि सामाजिक संशोधन पद्धतीचा संशोधनात उपयोग केलेला आहे.**

## संशोधनाची संदर्भ साधने -

ऐतिहासिक संदर्भ साधनांचे अनेक प्रकार असले तरी स्थूलमानाने त्याचे प्रमुख दोन प्रकार पडतात ते म्हणजे प्राथमिक साधने व दुय्यम साधने.

अ) प्राथमिक साधने -प्रामुख्याने प्राथमिक साधनांना अस्सल साधने असे देखील म्हणतात. प्राथमिक साधने मुलभूत स्वरुपाची असतात.यात अवशेष तसेच मौखिक व लेखी अभिलेख यांचा समावेश असतो.खानदेश परिसरातील भिल्लांच्या प्रगतीसाठी जॉन ब्रिग्ज या ब्रिटिश अधिकाऱ्याच्या नोंदी उपयुक्त ठरल्या.अधिकाऱ्यांनी लिहलेले पत्र, सूचना, आदेश तत्कालीन भिल्लांच्या हालचाली विषयी माहितीचा उपयोग केला आहे. आहे.

ब) दुय्यम साधने -एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्राच्या व खानदेशच्या वेगवेगळया विषयांवर अनेक संशोधकांनी संशोधनाचे कार्य केलेले आहे.आदिवासी जमातींच्या सामाजिक व आर्थिक इतिहासावर प्रकाश टाकणाऱ्या तत्कालीन ऐतिहासिक संदर्भसाधनांचा वापर केला आहे. डॉ.श्याम कायंदे यांच्या Popular Resistance to British Rule in North Maharashtra (१८१८-१८८५) या संदर्भावरुन खानदेशातील भिल्लांच्या उठावाबाबत नोंदी मिळतात. सिमकॉक्स ए.एच.ए., शेरिंग एम.ए., बेल मेजर ईव्हन्स, जॅक्सन विल्यम ए.व्ही या अधिकाऱ्यांच्या नोंदीवरुन आदिवासी भिल्लांविषयीची माहिती पुरवितात. त्यांच्या ग्रंथाचा उपयोग केला आहे.खानदेश परिसरातील भिल्लांच्या उठावासंदर्भात डॉ.खोबरेकर वि.गो.यांच्या महाराष्ट्रातील स्वातंत्र्य लढे (१८१८-१८८४) व डॉ.देशपांडे ए.एम. यांच्या जॉन ब्रिग्ज इन महाराष्ट्र या ग्रंथाचा संशोधनात उपयोग झाला.

धार्मिक विश्वास, श्रध्दा, परंपरांचा प्रभाव समाज जीवनावर पडलेला दिसून येतो.मानवी समाजात 'धर्म' हा एक अविभाज्य असा घटक आहे.प्रत्येक मानवी समाजाचे जनजीवन हे धार्मिकतेशी निगडित असते.आदिवासी समाजात देखील धर्माचे स्वरुप आढळून येते. आदिवासी समाजाचे जीवन हे निसर्गावर अवलंबून असते. त्यांना आपल्या गरजा पूर्ण करण्यासाठी नैसर्गिक घटकांवर अवलंबून राहावे लागते.सातपुड्यातील आदिवासी जमातींमध्ये एकसारख्या धार्मिक कल्पना नाहीत.वेगवेगळया जमातीत वेगवेगळया प्रकारच्या धार्मिक श्रध्दा आणि कर्मकांड असलेले आढळून येते. भिल्ल, पावरा या जमातीतील लोक अनेक देवी-देवतांना मानतात.आदिवासींमध्ये निसर्गदेवता व देवीदेवतांना महत्वाचे स्थान आहे. हे लोक अनेक देवदेवतांची पूजा करतात.त्यांचे संपूर्ण जीवन जंगलाशी व वनस्पतींशी संबंधित असल्यामुळे नैसर्गिक शक्तींचा ते आदर करतात.

### देवदेवता:-

सातपुडयातील आदिवासी निसर्गपूजक, प्राणीपूजकतेबरोबर ते वृक्षांना देवता मानून त्यांना भजतात. आदिवासींच्या जीवनात वेगवेगळया प्रसंगी वेगवेगळया देव-देवतांची पूजाविधी केली जाते. यात स्त्री-पुरूषरुपी दैवत मानतात.जिच्या ठिकाणी दिव्य तेज किंवा सामर्थ्य असते ती देवता होयआदिवासींच्या देवदेवतांची संख्या मोठी आहे.त्याचा मुख्य देव नसतो. खानदेश परिसरातील सातपुडापर्वत रांगामधील भिल्ल, पावरा, तडवी भिल्लांच्या विविध देवदेवता आढळतात.[१]

**१)याहामोगी :**सातपुडा पर्वताच्या पर्वतरांगामध्ये वसलेल्या 'देवमोगरा' गावी 'याहा मोगी' ही आदिवासींची कुलदैवत मानली जाते. ही देवता संपूर्ण आदिवासी स्त्रीच्या वेशात आणि अलंकारांनी नटलेली आहे.देवमोगरा या ठिकाणी मोठी यात्रा भरते.त्यावेळी लोक तिच्याकडे संतती व संपत्ती मागतात.लाखो भाविक देवीच्या दर्शनाला येतात.महाशिवरात्रीला येथे मोठी यात्रा भरते.या यात्रेच्या दिवशी सर्व आदिवासी लोक झाडांच्याखाली मुक्काम करतात.[२] दुसऱ्या दिवशी तोरणमाळहून पूजेचे साहित्य येते.त्याला 'पाती' म्हणतात.पाती आल्याशिवाय पूजा सुरू होत नाही.तोरणमाळ ते देवमोगरा हे अंतर सातपुड्यातून सुमारे ३५ किलोमीटर आहे.ही पाती आल्यावर 'वसावा' या घराण्याचे पूजारी देवीच्या मूर्तीला नदीत नेतात.या मूर्तीवर बांबूच्या नळकांडयातून पाणी टाकून आंघोळ घालतात.पहिल्या पूजेचा मान सागबारा संस्थानिकांना मिळतो. त्यावेळी सलामीसाठी बंदूक फोडली जाते. व यानंतर जनतेची पूजा सुरू करतात.देवीच्या पूजेचे साहित्य नव्या-कोऱ्या टोपलीत ठेवून ती टोपली पांढऱ्या वस्त्राने झाकली जाते. याला 'हिजारी' म्हणतात. ही हिजारी देवीच्या दर्शनाला निघाल्यावर कुठेही कोणत्याही कारणाने जमिनीवर ठेवायची नसते, अशी आदिवासींची श्रध्दा आढळते.**राणी काजल:-**सातपुड्यातील आदिवासी पावरा लोकांची ही कुलदैवत आहे. खानदेश गॅझेटिअर्स मधील नोंदनुसार, "ही देवता बावा कुंभाची पत्नी होती."असा उल्लेख आढळतो.या देवीची पूजा पूर्वेस बावा कुंभाच्या पूजाविधी पासून पश्चिमेस ३.५ कि.मी.अंतरावर पूजा करतात.सातपुड्यातील अक्राणी महालाजवळ या देवीचे काही ऐतिहासिक शिल्प असून चोपडा तालुक्यातील उमर्टी या गावी राणी काजलची समाधी आहे. हे गाव राणी काजल देवीच्या लेण्यांमुळे प्रसिध्द् आहे.[३]**गिरहूण माता :-** आदिवासी पावरा जमातीची 'गिरहूण' म्हणजेच कुलदेवता. प्रत्येक पावरा कुटुंबात घरातील सागाचे लाकूड 'स्वयंपाक घरात' चूलीजवळ रोवतात.त्या सागाच्या लाकडी खांबास गिरहूण देवता मानतात.**बावा कुंभा:-**पावरा आदिवासींचे हे दैवत असून सातपुडयातील पावरा लोकांच्या सर्व धार्मिक विधीत या देवतेला भजतात. पावरा लोकांच्या प्रमुख देवतेपैकी ही एक देवता असून गिरहण, इंदल पूजाविधीत यास नैवेद्य दाखवितात.या देवतेची मूर्ती, किंवा आकृती, प्रतिमा नसते.गरहूणची पूजा करतात.हे लोक कोणत्याही गोष्टीला प्रारंभ करण्यापूर्वी या देवीची पूजा करतात.

**ग्रामदेवता:-**खानदेश परिसरातील आदिवासींची अशी श्रध्दा आहे की, प्रत्येक जीवात देवत्व असते. त्यांच्यात कुठल्याही देवाचे स्थानक नसते, मूर्ती नसतात.निसर्गातील वृक्ष, डोंगर, नद्या, पशू-पक्षी, चांदण्या, सूर्य चंद्र यांच्यातच ते देवत्वाची कल्पना करून त्यांची पूजा करतात.त्यांच्या ग्रामदेवता ओबडधोबड असतात. माती, दगड, गोटे असे त्यांचे उपासनेचे स्वरुप असते.[४]**नागदेव :**नागाने दंश केल्यामुळे निधन झाले असेल तर त्या व्यक्तीच्या स्मरणार्थ शेतात किंवा गावाच्या बाहेर वेशीवर नागदेवाची लाकडी प्रतिमा उभारतात. सातपुडयात घनदाट जंगल असल्यामुळे अशा सरपटणाऱ्या प्राण्यांची त्यांना सतत भिती असते.जी व्यक्ती मृत झाली आहे तिच्याच प्रित्यर्थ अशी नागदेवतेची पूजा करतात. **डुठलदेव :-**आदिवासी लोक जंगलात, नदी-नाल्यात, डोंगरावर, टेकडीवर शेती करतात. शेतीच्या आजूबाजूला घनदाट झाडी असते अशा ठिकाणी भूत, पिशाच्च, हडळ, डाकीण यांना संतुष्ट करण्यासाठी त्या शेतीची पूजा करतात त्याला 'डुठल' असे म्हणतात.[५]**हुडोवदेव :-** सातपुड्यातील आदिवासी पावरा जमातीच्या कोणत्याही शुभकार्याच्या किंवा धार्मिक समारंभप्रसंगी सुरुवातीस 'हुडोवदेवाची' पूजा करतात. हा सर्वात कोपिष्ट, रागीट देव मानत असत६.**गोव्हाणदेव :-**'गोव्हाण' म्हणजे गायी-गुरे बांधण्याच्या गोठ्याला

'गोव्हाण' असे म्हणतात. सातपुड्यातील भिल्ल पावसाळ्यानंतर केव्हाही या देवाची पूजा करतात. आपल्याकडे आपल्या घरात गायी गुरे अबाधित राहावीत, दूध कमी पडू नये, आपला गोठा कधीही खाली होऊ नये, गायी-गुरे, बैल, म्हैस, बकऱ्या, कोंबडया, वासरु इत्यादी जनावरांनी गोठा भरलेला राहावा.[६]**आयखेडा :-**ही देवता गावातील एका मोठ्या झ ाडाखाली दगड, गोटयांना शेंदूर लावून स्थापन केलेली असते. 'आयखेडा' देवतेला धन-संपत्ती, व सुख-समृध्दीची देवता मानतात. या देवतेची पूजा धनत्रयोदशीला व्यक्तिगत किंवा सामूहिकरित्या करतात.**वाघदेव किंवा बापदेव :-** वाघ जंगलातील शक्तीमान प्राणी असल्यामुळे आदिवासी जमातीत त्याला देव मानतात. गावाच्या वेशीवर प्रत्येक पाडयावर एखाद्या झुडूपात दगडी गोट्याला शेंदूर फासून वाघदेवाची प्रतिमा तयार करुन त्याची पूजा करतात.**पालूड्योदेव :** वसंत ऋतूत झाडांना नवीन पालवी फुटते व कंदही फुटतात. निसर्ग देवता म्हणून पालूड्योदेवाची पूजा करतात.आदिवासींना कंद व नविन पालवी अन्न व भाजीपाला खाण्यासाठी ही देवता उपलब्ध करुन देते.अशी त्यांची भावना असते.[७]**निलपादेवी :-**पाऊस सुरू झ ाल्यानंतर सगळीकडे हिरवळ असते. नवे गवत, वेली, पाने, फुले यांनी निसर्ग हिरवागार झालेला असतो.शेतात नवीन पालेभाजी उगवलेली असते.अशावेळी आदिवासी लोक 'निलपादेवीची' पूजा करतात. भिल्ल लोक याला निलीचारी' असे म्हणतात.[८]

**वृक्षदेवता :-** आदिवासी लोक वृक्षांना सुबत्तेचे प्रतीक समजतात. महावृक्ष स्वतः उन्हात उभे राहतात आणि आपल्याला सावली देतात.ते दुसऱ्यांसाठी फळे धारण करतात. स्वतःसाठी नाही याच धारणेतून आदिवासी लोक वृक्षांना देवता मानून त्यांची पूजा करीत होते.[९] **वड :** सातपुडापर्वतराजीत वडाची विपूल झाडे आढळतात. हया झाडाला स्त्री संरक्षण मानले जाते.स्त्रियांच्या रोगावर वडाची पाने, साल, वटशृंगयाचा उपयोग होतो.वटशृंगे दूधातून सेवन केल्यास वंध्य स्त्रीला दिवस राहून अपत्य प्राप्ती होते.गावात वडाचे झाड असणे आदिवासी लोक शुभ मानतात.**पिंपळ** :आदिवासीं पिंपळाच्या वृक्षास पवित्र मानतात. या वृक्षावर भूत-पिशाच्चाचे वास्तव्य असते अशी त्यांची धारणा असते.प्रत्येक गावात पिंपळाच्या झाडाखाली शेंदूर लावलेले दगड ठेवलेले असतात ते त्यांची पूजा करतात.**कदंब :-**पावरा लोकांचा इंदल सण 'कदंब' वृक्षाच्या फांदीशिवाय साजरा होत नाही. कदंब वृक्षाच्या फांदीला हे लोक इंद्रदेवाची प्रतिमा मानतात. 'इंदल' उत्सवावेळी या वृक्षाची रात्रभर नृत्य करुन बकरे, कोंबडे अर्पण करुन पूजाविधी केला जात होता.[१०]**औदूंबर :**या वृक्षाच्याखाली काही दगड ठेवून त्याची देव म्हणून पूजा करतात. आदिवासींच्या होळी नृत्यातील बावा, बुध्या यांच्या गळयात उंबराच्या माळा घालतात म्हणूनच ते या वृक्षाला अतिशय पवित्र मानतात. **शमीवृक्ष :**आदिवासींच्या पारंपरिक लग्नविधीत शमीवृक्षाला अत्यंत महत्वाचे स्थान असते. याला 'आपटा' म्हणून संबोधतात.भिल्ल-पावरी भाषेत 'हेंगल' असे म्हणतात.**रुई :**आदिवासी भिल्ल-पावरा जमाती याला 'आकडा' असे म्हणतात. एखाद्या पुरूषाच्या दोन बायका मृत झाल्या व तिसऱ्यांदा त्याला लग्न करायचे असल्यास त्या होणाऱ्या वधूचा किंवा वराचा अपमृत्यु होऊ नये म्हणून वराचे प्रथम रुईशी लग्न लावण्याची प्रथा होती. **मूर्तिपूजा :-**सातपुड्यातील आदिवासी मूर्तिपूजक आढळून येत नाही. गावशिवेवर गोल दगड, गोटे तसेच उभ्या शिळा हीच त्यांच्या धार्मिक जीवनाची प्रतीके आढळतात.सातपुडा परिसरात असलेल्या वस्तूंना, प्राण्यांना, पर्वत-शिखरे, अन्नधान्य, हिंस्त्रप्राणी यांना हे लोक देव देवतांचे रुप देतात.कडेकपारीतील, गुहांमधील सरळकोट उभ्या खडकांना शेंदूर फासून त्यांनाच मूर्ति मानतात.जंगलातील सागवानी लाकडाचा तुकडा स्वयंपाक घरात रोवून कुलदेवता म्हणून त्याची पूजा करतात.गावावर अरिष्ट कोसळू नये म्हणून गावाच्या संरक्षणार्थ शिवाऱ्या देवाची पूजा करतात.दूधदुभत्यासाठी गवळीदेवाची पूज करतात.अन्नधान्याच्या बरकतीसाठी कणसरी मातेस भजतात.वाघाने गावातील लोकांना त्रास देऊ नये, त्यासाठी वाघाची पूजा करतात.याचबरोबर ते वृक्षांची पूजा करतात. अस्तंबा या उंच शिखरावर दगड, गोटे ठेवलेले आहेत या दगड गोट्यांना ते 'अश्वत्थामा' मानतात.राणीकाजल व 'याही मोगी' मातेच्या मूर्तिंचा अपवाद वगळता सातपुड्यात आदिवासी देव-देवतांच्या मूर्त्या आढळून येत नाही.[११] आदिवासी मूर्तिपूजा करीत नसले तरी नागरी आणि ग्रामीण भागातील भव्य मंदिराप्रमाणे आदिवासींची मंदिरे मोठया प्रमाणावर आढळत नाही. याची मूर्तिपूजा म्हणजे शेंदूर लावलेले लाकूड, दगडाची गोटे, मातीच्या मूर्ति यांची ते पूजा करतात.मूर्तिपूजा करण्यासाठी पूजारा, भगत ही संस्था कार्यरत असलेली आढळते.पूजाविधी करण्यासाठी ब्राम्हण, पुरोहित यांना बोलवत नाही. खानदेश परिसरातील सातपुडा पर्वतरांगांमधील आदिवासी लोकांमध्ये समारंभाद्वारे आपल्या स्वतंत्र देवदेवतांची पूजा करण्याची पध्द्त होती त्याचा विशिष्ट विधी असतो.**पूजाविधी :-**सातपुडा परिसरातील आदिवासींच्या पूजाविधीत भगत, पूजारा, होवऱ्या, सुईण यांची महत्वाची भूमिका होती. त्यांचा पूजाविधी, उपासना, तंत्र-मंत्र इत्यादी फक्त त्यांच्यातील पुरोहित असलेल्या भगत व पूजारा हया संस्थेमार्फत होत होती. जन्मापासून ते मृत्युपर्यंत सर्व संस्कारात ते पूजाविधी करतात.**जन्मविधी :-**बाळाचा जन्म ही सर्वसाधारपणे घटना आहे, ती नैसर्गिक घटना असते. आदिवासींच्या पाड्यावर, गावामध्ये बाळंतपण करणारी जाणकार स्त्री असते तीला 'हुवारकी' (सुईण) असे म्हणतात.[१२] बाळाचा जन्म झाल्यावर बाळाची नाळ विळयाने कापली जाते. नाळ कापल्यानंतर बाजूला केलेल्या वारेचा (placenta) भाग

घरातील गोठयामध्ये एका कोपऱ्यात खड्डा खोदून पूरला जातो.यावेळी पूजारा व हुवारकी बाळाला व प्रसूत स्त्रीला गरम पाण्याने आंघोळ घालतात.चार दिवसांपर्यंत त्या स्त्रीला स्पर्श करीत नाही.तिचा पाचव्या दिवशी विधी केला जातो.त्या विधीमध्ये सुईणला मुलगा झाल्यास २ आणे, मुलगी झाल्यास १ आणे व दारुची बाटली दिली जात होती. हा जन्मविधी हुवारकीच करीत असते याला 'बारा काढणे' असे म्हणतात.**गिरहण पूजाविधी :-**आदिवासी पावरा जमातीत हा विधी करतात. घरात प्रथम गिरहूणची पूजा पुजाराच्या देखरेखीखाली होते.पुजारा सर्वात अगोदर घरातील दोन सूनांना पणती 'कुडया' तयार करण्यास सांगतो, आणि त्यांच्या हस्ते गिरहूणला ओवाळण्यास सांगतो.**इंदीराजा पूजाविधी :-**पूजाराच्या देखरेखीखाली हा पूजाविधी काटेकोरपणे केला जातो. इंदीराजा म्हणजे कदंब वृक्षाची फांदी.कदंब वृक्षाजवळ पूजारा पूजेचे साहित्य मांडून पूजेस सुरूवात करतो. कदंबाच्या बुध्यास कच्चा सुताचे धागे गुंडाळतो, हा पूजाविधी एक ते दिड तास चालतो.**वाघदेव पूजाविधी :-**गावाबाहेरील जंगलात जेथे वाघदेवाची स्थापना केलेली असते तिथे सर्व गावकरी एकत्र जमतात. या ठिकाणी सर्व जण कपडयात पावशेर भर धान्य घेऊन येतात.सोबत आणलेले दूध, अंडी, शेंदूर, अगरबत्ती, नारळ इत्यादी साहित्य पुजारा मांडतो.साहित्याची मांडणी झाल्यावर वाघदेवाच्या पूजाविधीस आरंभ होतो. पुजारा घुमू लागतो, त्यानंतर जंगलातील प्राणीमात्रांना, जीवजंतूना, झाडे, पाने, फूले, फळे यांना आवाहन करुन 'वाघदेव' पूजाविधी केला जातो. **अस्तंबा पूजाविधी :-** सातपुड्याच्या उंच अशा शिखरावर 'अस्तंबा' या ठिकाणी धनत्रयोदशीच्या दिवशी लाखो आदिवासी जातात. या शिखराला आदिवासी लोक 'अश्वत्थामा' मानतात.शिखरावर पाच-सहा दगड ठेवलेले आढळतात.त्यांचा पूजाविधी करण्यासाठी आठ ते दहा पुजारी व भगत बसलेले असतात.येथे एकही वृक्ष आढळत नाही.आदिवासी लोक सोबत गाय, म्हशीचे दोर, बैलाच्या गळयातील कंठा घेऊन जातात.[१३] पायथ्याशी नारळ, शेंदूर, अगरबत्ती यांची पूजा करतात. येथे पूजा झाल्यानंतर शिखरावर पूजाविधी त्यांचा पूजारा करीत असतो.**भगत :-** आदिवासींच्या धर्मविषयक कार्यामध्ये 'भगत' हा कमालीचा महत्वपूर्ण घटक असतो. भगतांवर त्यांची नितांत श्रध्द्ा व निष्ठा असते.तो सांगेल त्याप्रमाणे हे लोक करतात.मंत्र-तंत्राद्वारे देवतांच्या कोपातून आजारी माणसाला मुक्ती देणारा म्हणून समाजात त्याला मानाचे स्थान होते.खेडेगावात अत्यावश्यक असणाऱ्या गोष्टीत एखादा भगत असणे आवश्यक मानले जात होते.याला देवऋषी असेही म्हणतात.वैद्य, ज्योतिषी आणि मांत्रिक या नात्यांनी काम करणाऱ्या व्यक्तीला 'भगत' ही संज्ञा आहे.बहुतेक सर्व जातीत भगत असतात.सातपुड्यातील आदिवासींवर 'भगत' या व्यक्तीचा प्रभाव होता.कारण जंगलातील झ ाडे व मूळ्यांविषयी त्याला अधिक माहिती असल्यामुळे तो बऱ्याच रोगांवर औषधी देणारा वैद्य म्हणून ओळखला जात असे. **भगतिणी :-** भगताप्रमाणे आदिवासी स्त्रियांदेखील भगताचे काम करीत होत्या. जमातीत स्त्री-पुरूष लिंगभाव अडथळा ठरत नव्हता.भगताचे काम जी स्त्री करते तिला 'भगतिणी' असे म्हणतात.भगतिण असलेल्या स्त्रिया सातपुड्यात मोठ्या प्रमाणात आढळतात.भगतप्रमाणे भगतिणदेखील भूत-पिशाच्च, रोगराई, संकेत यासारख्या समस्यांवर तंत्र-मंत्र करीत होती. भगतांच्या सर्व क्रिया भगतीण करते.भगताकडून मन समाधान न झाल्यास लोक भगतिणीकडे जात असत.[१४]**पुजारा :-** भगत हा अंशकालीन धर्मव्यवसायी असतो तर पूजारा हा पूर्णकालिक धर्मव्यवसायी असतो.भगत व पूजारा यांच्यामध्ये मुलभूत फरक आहे. पारलौकिक शक्तीकडून प्राप्त झालेल्या सिध्द्ी व जादूविषयक प्रथांचे ज्ञान यांच्या आधारे 'भगत' अलौकिक विश्वातील दिव्य प्राण्यांवर आपला प्रभाव पाडून त्यांना आपल्या हेतूपूर्तीसाठी आपल्या बाजूने वळविण्याचा प्रयत्न करतो.त्याचे प्रयत्नाचे स्वरुप सक्तीचे असते. तर 'पुजारा' ही संस्था पूजा-अर्चा, प्रार्थना, आराधना या मार्गाने पारलौकिक अथवा दिव्य शक्तींना प्रसन्न करुन घेवून तिचा कृपा प्रसाद पदरी पाडून घेण्याचा प्रयत्न करतो.खानदेश परिसरातील आदिवासी जमातींच्या होळीपूजा, लग्नविधी, जन्मविधी, मृत्यूविधी, गिऱ्हणविधी, नवायविधी, इंदलविधी, वाघदेवविधी, गोव्हणविधी, निलपीविधी, गावदिवाळी आदि सारख्या महत्वाच्या सण-उत्सव, धार्मिक विधीप्रसंगी पूजाराला सक्तीने कामे करावी लागत होती.त्यामुळे पूजारा ही एक विशेष पवित्र व्यक्ती आहे असे मानले जात होते.पूजाराशिवाय आदिवासींचा कोणताच विधी केला जात नाही. त्यामुळे त्याचे समाजात महत्वाचे स्थान असते.[१५]**पूजारिणी :-** पूजेचा संपूर्ण पूजाविधी करणाऱ्या स्त्रीला 'पूजारिणी' असे म्हणतात. सातपुड्याच्या पर्वतरांगांमध्ये अशा स्त्रिया प्रत्येक वस्ती-पाडयांवर आढळतात.लग्नविधीच्या वेळी सुईणीला पूजारिण स्त्री ही मंत्र-तंत्रा द्वारे मदत करीत असे. **मंत्र :-** सातपुडा परिसरातील आदिवासींमध्येही मंत्र विद्येला महत्वाचे स्थान होते. व्यक्तींचा मृत्यू नैसर्गिक किंवा निसर्गक्रमाने घडू शकतो ही कल्पना आदिवासींना मान्य नव्हती.याउलट इतरांनी केलेल्या चेटकक्रियेच्या किंवा काळ्या जादूच्या प्रभावामुळेच कोणत्याही व्यक्तींचा मृत्यू घडत असतो.अशी त्यांची धारणा होती.म्हणून मृत्युला कारणीभूत असणारी व्यक्ती शोधून काढण्यासाठी ते मांत्रिकाकडे जातात.हा मांत्रिक म्हणजे आदिवासींचा भगत असतो. सातपुडा परिसरातील आदिवासी साप, विंचू चावल्यास तो मंत्राने उतरतो अशी त्यांची श्रध्द्ा होती.**आत्मा :-** मृत मानवाच्या आत्म्याविषयी आदिवासींच्या खास अशा काही कल्पना होत्या. चांगला व दुष्ट आत्मा ते मानतात.अविवाहित माणूस मेला तर तो जंगलभर भटकत राहतो, गर्भार बाईच्या प्रेतास तिच्या पोटातील गर्भासहित जाळले तर तिचा आत्मा अघोरी योनीत प्रवेश करतो. दुराचारी स्त्री मेल्यावर तिला घुबडाचा किंवा डाकिणीचा जन्म

मिळतो.**पुनर्जन्म :-** मनुष्य मेल्यावर त्याचा जीव वृक्षवनस्पतीत किंवा पशूपक्ष्यांत प्रवेश करतो, किंवा त्याच घरातील स्त्रीच्या पोटी पुन्हा जन्म घेतो.अशी समजूत आदिवासी जमातींच्या लोकात प्रचलित होती.पावरा लोकांचा पुनर्जन्मावर अतूट विश्वास असतो. माणूस मेल्यानंतर बारा दिवसात त्यास दुसरा जन्म घ्यावा लागतो असा त्यांचा विश्वास होता.मध चोरणारा कीटक होतो, दुध चोरणारा गाय होतो, मांस चोरणारा गिधाड होतो, वस्त्र चोरणारा पक्षी होतो, हरीण चोरणारा लांडगा होतो, घोडा चोरणारा वाघ बनतो आणि फळेमुळे चोरुन खाणारा वानर होतो व स्त्रीला पळवून नेणारा अस्वल होतो अशा धारणा सातपुड्यातील आदिवासी जमातीत प्रचलित होत्या.[१६]**नवस :-**एखाद्या देवतेला काहीतरी वस्तू देण्याचे मान्य केले, की ती प्रसन्न होऊन आपली इच्छा पूर्ण करते, अशी लोकांची समजूत होती. वेगवेगळ्या देवदेवतांना असंख्य प्रकारचे नवस बोलले जातात आणि ते फेडले जात असत. इष्ट कामनेची पूर्ती व्हावी म्हणून देव-देवतेला दिलेले पूजोपचारांचे अभिवचन किंवा एखादा पदार्थ अर्पण करण्याची प्रतिज्ञा म्हणजे नवस होय. आदिवासींमध्ये देखील आपल्या देवतांना नवस करण्याची प्रथा जूनी दिसून येते. खानदेश परिसरातील आदिवासी लोक डोंगरदेव, वाघदेव, खांबदेव आदि देवतांना नवस करतात तर कनसारा देवी, देवमोगरा ही देखील त्यांची दैवते होत.**बळीप्रथा :-**कॉलरा, देवी, प्लेग असे रोग देव देवतांच्या प्रकोपामुळे होतात तेव्हा त्या देवतांना प्रसन्न करण्यासाठी मानवाचे रक्त अर्पण केले पाहिजे असा समज होता.एका काळी कित्येक आदिवासी जमातीत ग्रामदेवतांना नरबळी देण्याचीही प्रथा होती.देवीपुढे माणसाचे मुंडके तोडून ते तिच्या मांडवाला टांगून ठेवीत.ही प्रथा भारतातील प्रत्येक समाजात रुढ होती.परंतु नरबळीच्या पध्द्तीला पर्याय म्हणून पशू, पक्षी व बकरा तर काही ठिकाणी रेड्याला बळी देत होते.बळी दिलेल्या प्राण्यांचे मांस भक्षण करत होते.अशा पशूंचे मांस आणि रक्त प्रसाद म्हणून वाटला जात होता.[१७]**भूतबाधा :-**सातपुड्याच्या घनदाट अरण्यात संचार करणाऱ्या आदिवासी जमातींचा भूत-पिशाच्च या कल्पनांवर अतुट विश्वास होता. भूताखेतांच्या अवकृपेमुळेच मानवी शरीरात रोगांचा प्रादुर्भाव होतो असा बहुसंख्य आदिवासी समाजातील लोकांचा समज होता.भुते माणसाच्या अंगात संचार करतात व त्यामुळे मनुष्य घुमतो.अशी लोकांची धारणा होती.अशा माणसाला ते लोक भूत काढण्यासाठी भगतकडे नेत असत.भगतदेखील आपल्या यातुविद्येच्या साहाय्याने रोगनिवारण्याचे काम करीत होता.भगताच्या माध्यमातून ही भूतेखेते त्यांच्याशी संपर्क साधतात, जिवंतपणी त्या व्यक्ती ज्या ठिकाणी राहत होत्या, त्याच्या आसपास ही भूते राहतात अशी आदिवासींची समजूत होती.ही भूतेही त्यांना अन्नदान केले नाही तर, वृक्ष तोडल्यास, किंवा शेत नांगरल्यास ते भिल्लांवर रागावतात.अशी समजूत होती. ते स्मशानभूमी जागृत मानतात. त्यांची अशी धारणा असते की, भूते विशेषत: पिंपळ, वड, चिंच, आंबा, कवठी, बाभूळ या वृक्षांवर वास्तव्य करतात या वृक्षांची पूजा केली नाही नदी, नाले, गावशिव इत्यादींची पूजा न केल्यास ते प्रकट होतात.**शुभ समजूती :-** आदिवासी जमातींमध्ये शुभ कामासाठी घरातून बाहेर पडताच सवाष्ण स्त्री पाण्याची घागर घेऊन सामोरी येणे हे फारच शुभ मानले जाते. अचानक गाय हंबरणे, कोंबडया कुचकुचणे तसेच झाडावर किंवा घरावर राव कागळी (कावळा) ओरडणे म्हणजे घरात पाहुणे येतील असे समजणे.मुंग्या आपली अंडी वर घेऊन चालल्या की समजावे भरपूर पाऊस पडेल, कावळयाने आपले घरटे शेंडयाला बांधले तर समजावे की यंदा वारा-पाऊस कमी आहे. जमिनीत किडे, किटक झाले, पिंपळाचे झाड हिरवेगर्द झाले, गुलमोहर आगीसारखा फुलला, पळसाला केसरी रंगाची फुले आली म्हणजे पावसाळा सुरू होणार असे समजत होते.[१८]मोर नाचतांना ओरडणे, कोकिळा दीर्घकाळ ओरडत राहणे म्हणजे लवकरच पाऊस येईल.लग्नसंबंधी सोयरीक करण्यासाठी बाहेर पडतांना रस्त्यात मांजर आडवी येणे पावरा लोक शुभ मानीत असत. चुलीवरुन तवा, भांडे खाली उतरवतांना तव्याच्या किंवा भांड्याच्या पाठीमागील भागात बारीक-बारीक ठिणग्या चमकणे म्हणजे तवा हसणे, असे झाल्यास घरी पाहुणे येतात अशी समजूत होती.**अशुभ समजूती :-** सातपुड्यातील आदिवासी जमातींमध्ये अशुभ समजूतींचा जबरदस्त पगडा होता. एखादी घटना घडल्यानंतर त्याच्या वाईट परिणामावर लोक अपशकूनाचा विचार करीत असत.स्त्रियांनी संध्याकाळी वडाच्या वृक्षाखालून जाऊ नये कारण 'मुंज्या' (भूत) तिला झपाटतो व पुरूषांनी अशा वेळी विहिरीजवळून जाऊ नये कारण हडळ त्याला विहरीत ओढून नेते अशी समजूत होती.कुत्र्याचे व अस्वलाचे रडणे, घूबळ ओरडणे अशुभ मानत असत, घुबडाला दगड मारु नये तो दगड घुबड झेलते व झिजवते.दगड जसा झिजेल तसे आपण झिजतो व शेवटी मरतो अशी भ्रामक कल्पना होती. **अंगात येणे :-**सातपुड्यातील आदिवासी जमातींमध्ये अंगात येणे या प्रकारांवर खूप विश्वास होता. एखादे माणूस अवचित घुमू लागले, हातवारे करु लागले, शाप किंवा वर यास्वरुपात काही उद्‌गार काढू लागले, की त्याच्या अंगात आले असे म्हणतात.अंगात येणे म्हणजे एखाद्या देवतेचा किंवा भूताखेताचा शरीरात संचार होणे असे समजतात. भूत अंगात आल्यास त्यास झडपणी किंवा झपाटणे असे म्हणतात. भगत, देवऋषी किंवा ग्रामदेवतेचा पूजारा यांच्या अंगात त्या-त्या देवतांचा संचार होतो व त्यांच्या मुखाने ती देवता ग्रामस्थांचे चांगले किंवा वाईट बोलून दाखवते, तसेच त्यांना विशिष्ट कार्याचा किंवा बलिदानाचा आदेशही देते.अशी आदिवासी लोकांची समजूत होती. **मूठ मारणे :-**खानदेश परिसरातील सातपुड्यातील आदिवासींचा 'मूठ मारणे' या क्रियेवर कमालीचा विश्वास होता. मूठ मारुन ठार करणे, आजारी पाडणे, तोंडावाटे रक्त पाडून मारणे, जारण-मारणचा शाबरी प्रयोग करणेइत्यादी अनेकविध मार्गाने

जादू करुन भगत व डाकीण मूठ मारुन ठार मारतात अशी लोकांची धारणा होती. या प्रकारात काही मूठी ठराविक मुदतीच्याही असतात.तेवढया मुदतीत माणूस मरतो.असा विश्वास आदिवासींचा होता. वेगवेगळया मंत्राद्वारे विशिष्ट उच्चारांद्वारे, विशिष्ट शक्ती निर्माण करता येते या मंत्राद्वारे त्रासही देता येतो असा समाजाचा विश्वास होता.जमातींमध्ये होवऱ्या, पूजारा, भगत, डाकीण यांच्याकडे मूठ मारण्याचा व ती परतवण्याचे मंत्र असतात.अशी लोकांची समजूत होती. मूठ परत फिरवण्याच्या मंत्रात हेलीमूठ, आगनीमूठ, चमकीमूठ, भाटीमूठ, उडदीमूठ इत्यादी मूठींची नावे घेऊन त्यातील ज्या प्रकारची मूठ असेल त्या प्रकारची मूठ परत फिरावी अशी अपेक्षा व्यक्त केली जात होती. आदिवासी जमातीतील लोकांचे धार्मिक जीवन जादूविद्येने व्यापलेले असल्याने ते या क्रियेला फार भित असत. **उतारा :-** शारीरिक आणि मानसिक रोगांचा उद्‌भव काही अतिमानवी शक्तींच्या किंवा भुताखेतांच्या अवकृपेमुळे होतो, अशी प्राथमिक अवस्थेतील मानवाची श्रध्दा होती. रोगाच्या वास्तविक कारणांचे अज्ञान असल्यामुळे रोगाचे स्वरुप कितीही भयंकर असले तरी औषधोपचाराऐवजी दैवी उपाय करण्याचीच प्रवृत्ती अशिक्षित आदिवासी लोकांमध्ये आढळते.मांत्रिक किंवा डाकीण यांच्या जादूप्रयोगातून रोग निर्माण होतात असे ते मानत. जादूने रोग झाला असल्यास ते 'उतारा करुन' घालवीत होते.**डाकीणप्रथा :-** एखाद्या घरात, गावात किंवा पाडयात वाईट घटना घडली तर त्यामागे एखाद्या स्त्रीने केलेले 'चेटूक' हेच कारण आहे असे मानले जात होते. स्त्री रजस्वाला किंवा गरोदर असतांना, अथवा प्रसूत होताना मरण पावली तर ती भूत होते.या भुताला चुडेल किंवा चेटकीण असे म्हणतात.काही स्त्रियांना मंत्रविद्या येत असते या विद्येचा प्रयोग त्या इतर व्यक्तीवर मंत्रविद्येच्या साहाय्याने किंवा मूठ मारुन व्यक्तींना तसेच जनावरांना आजारी पाडू शकतात. अशा स्त्रियांना आदिवासी लोक डाकीण असे म्हणतात.भिल्ल लोक तिला 'डोको' तर पावरा लोक 'डाकण' असे म्हणतात.चेटूक क्रिया करणारी स्त्री 'चेटकीण' डाकणी किंवा डाकीण म्हणून आदिवासींमध्ये ओळखली जात होती. खानदेशातील आदिवासी समाजात डाकीण प्रथा अस्तित्वात होती या 'डाकीण स्त्रीवर' समाजाचा कमालीचा विश्वास होता.आदिवासी समाजव्यवस्थेत 'स्त्री डाकीण' शोधण्याचा अधिकार पुरूष 'भगत' या संस्थेकडे असतो. एखाद्या स्त्रीला डाकीण ठरविण्याची आदिवासींची विशिष्ट पध्द्त होती.गावातील, पाडयावरील लोक डाकीण स्त्रीचा शोध घेऊन तिला बहिष्कृत करतात.डाकीण काढलेल्या स्त्रीला 'मी डाकीण नाही' हे सिध्द् करण्याच्या सातपुडयातील आदिवासी जमातीमध्ये अनेक विधी प्रचलित होत्या. डाकीण काढलेल्या स्त्रीची परीक्षा घेतांना तिला चांभार कुंडयाचं पाणी प्यायला लावणे किंवा एखादी जड शिळा उचलायला लावणे.सातपुड्यातील आदिवासी जमातींमध्ये डाकीण ठरविलेल्या स्त्रीला देहदंड, मृत्युदंड या सारख्या शिक्षा देण्याच्या प्रथा अस्तित्वात होत्या. एखाद्या घरात गुरेढोरे मेली, लहान मुलांचा मृत्युझाला, कुटूंबावर संकटे आली की, गावपंचायत बसत असते. या पंचायतीमध्ये 'डाकीण' ठरविलेल्या स्त्रीला शिक्षा देण्याचा ठराव केला जात असे.**अंत्यविधी :-** खानदेश परिसरातील सातपुडा पर्वतरांगामध्ये वास्तव्य करणाऱ्या आदिवासी जमातींमध्ये अंत्यसंस्कार करण्याच्या विविध विधी आढळतात. मृत व्यक्तीला पुरतात किंवा जाळतात.साथीने मेलेल्या रोग्यांना पुरतात त्याचप्रमाणे पाच वर्षाच्या आतल्या मुलांना देखील पुरतात.गरोदर स्त्री मेल्यास तिला दूर जंगलात नेऊन पुरतात.पावरा लोकात मृत्यु होतो तेव्हा गवाल, मांदलवाजा लोक वाद्ये वाजवून ती गोष्ट जाहीर करतात.मग आजूबाजूचे सर्व लोक तिथे जमतात.मग ते सर्व मिळून प्रेत स्मशानात नेऊन जाळतात किंवा पुरतात.तर भिल्लांमध्ये कुणी व्यक्ती मृत झाल्यास चर्मवाद्य, काशाची थाळी वाजवतात.या चर्मवाद्याला 'तूर' असे म्हणतात.या वाद्यांच्या सुरावरुन लोक मृत झालेल्या व्यक्तीच्या घरी पोहचतात.सोबत सर्व प्रकारच्या धान्याची पूडी, मीठ, मिरची आणि एक-दोन रुपये आणतात.यावेळी सर्व पाडयावरील, आजूबाजूच्या गावातील लोक गोळा होऊन स्त्रिया मोठ-मोठ्याने रडतात.मृत व्यक्तीचा अंत्यविधी करण्यापूर्वी गावातील लोक तिरडी बनवितात तिला ते 'डुली' असे म्हणतात.मृतास दांत घासून, आंघोळ घालून नवीन कपडे घालतात.अन्नाचा घास, चहा, दारुचे थेंब तोंडात टाकल्यावर प्रेत तिरडीवर ठेवतात. घराच्या अंगणात मृत व्यक्तीस डोक्यावर तिरडी घेऊन चारही दिशांना फिरवून 'पृथ्वीप्रदक्षिणा' घातली जाते.[११] हे झाल्यावर मृत व्यक्तीची आई, मुलगी, पत्नी, पती यापैकी कोणालाही विसाव्यापर्यंत मृत व्यक्तीबरोबर झोपवतात. विसाव्यावर विश्रांतीसाठी प्रेत ठेवतात त्यांच्यातील 'आग्या' अन्नधान्य, बांबूची टोपली टाकून मडके फोडतात.मडके फोडण्याची क्रिया ज्या दगडाने करतात तोच दगड 'अश्मा' म्हणून पुढे 'श्राध्द्' होईपर्यंत वापरतात.प्रेताचा जीव अंत्यक्रिया पुर्ण होवून स्वर्गमार्गाला लागेपर्यंत त्या दगडात वास करुन राहतो, अशी समजूत होती.भिल्ल जमातीत पुरूष मृत झाला असेल तर त्याच्या बायकोची चोळी त्याच्या उशाजवळ ठेवतात आणि स्त्री मृत झाली तर पुरुषाचा अंगातला शर्ट काढून तिच्या उशाजवळ ठेवतात.अविवाहित पुरूष असेल तर त्याच्या शरीराला हळद, लावण्याची प्रथा प्रचलित होती.स्मशानात प्रेत नेल्यावर तेथे चिता रचली जाते.प्रत्येक घरातून एक-दोन लाकूड घेऊन स्मशानात रचून ठेवतात.पुरूषांसाठी सात थरांची व स्त्रीसाठी आठ थरांची चिता रचतात. जाळण्यापूर्वी मृताची पूजा करुन त्याला अन्न देतात, चितेवर वस्त्र, द्रव्य व अलंकार ठेवतात. पुरूष मेला असेल तर तिरडीवर धुनष्यबाण ठेवतात.कुळातील वृध्द् पुरूष चितेला अग्नी देतो.अंत्यविधीत स्त्री-पुरूष, मुले-म्हातारी माणसे सर्वच सहभागी होतात.घरी परततांना मृतात्म्याचा जीव म्हणून 'अश्मा' दगड घरी आणतात.घराबाहेर पाण्याचे शिंतोडे अंगावर

घेऊन घरात प्रवेश करतात.घराच्या एका कोपऱ्यात तो जीव सुरक्षित ठेवतात. गावात कुणी मृत झाले असेल तर कोणाच्याही घरात प्रेत काढेपर्यंत अन्न शिजवले जात नाही.प्रेत जाळल्यानंतर दुसऱ्या दिवशी 'मट्टयो धुवणे' कार्यक्रम करतात.मृताच्या अस्थि पहाटे गोळा करुन दहनाची जागा पाण्याने धुवून काढतात.त्यांनतर मृत व्यक्तीचे उत्तरकार्य करण्याचे ठरविले जाते.हे सर्व लोक मृताच्या घरी जमतात.तेथे कोंबडीचा बळी देऊन पान मुवण्याचा कार्यक्रम केला जातो.यात पिंपळवृक्षाची पाने आणून त्यात पाणी घालून घरात व घराबाहेर मृत व्यक्तीच्या नावाने शिंपडतात व ती फाडून टाकतात. त्यांनतर घर सारवून, झाडून शुध्द् करतात.**उत्तरकार्य :-** सातपुड्यात वास्तव्य करणाऱ्या आदिवासी जमातींमध्ये पितरांना संतुष्ट करण्यासाठी विशिष्ट विधी केला जात होता. मृत व्यक्तीच्या अंत्यसंस्कारानंतर आठव्या दिवशी गंधमुक्तीचा कार्यक्रम केला जात होता.तर बाराव्या दिवशी उत्तरकार्य करण्याची प्रथा होती.भिल्ल जमातीत याला 'तियाजो' असे म्हणतात.तर पावरा लोक यास 'मयलानपान' किंवा 'बारमो' म्हणतात.पूर्व सातपुड्यातील पावरा लोक या विधीस 'बारदाहडू' म्हणतात. आदिवासी जमातीत उत्तरकार्य हे रविवारी करण्याची प्रथा होती. बाराव्या दिवशी हा विधी केला जातो.मात्र भिल्ल जमातीत महिन्यानंतर किंवा घरातील दोन-तीन व्यक्ती मृत झालेल्या असतील तर हा विधी केव्हाही करण्याची प्रथा होती.पहिल्या दिवशी अन्नपदार्थ तयार केले जातात.त्याचे दोन भाग करतात एक भाग बांबूच्या टोपलीत ठेवतात.ज्याला 'साबी' म्हणतात.दुसरा भाग घराच्या मागच्या बोळीत ठेवतात.उत्तरकार्य जर पुरूषाचे असेल तर स्त्रिला लाला पातळ पांघरुन बसवतात त्याला 'कल्पू लुगडो' असे म्हणतात.ते सर्व गावकरी स्मशानाजवळ जातात तेथे मृतात्म्याला जेवण देण्याची रित करतात.रात्री तूर, थाळी आणि पावा वाजवून रात्रभर 'नृत्य' करतात.पावरा लोक उत्तरकार्यात नृत्य करीत नाही.भिल्ल लोकांमध्ये रात्री म्हातारी माणसे 'कथा' सांगत असत.पावरा लोकांमध्ये रात्रभर मांदळ वाजवतात.लोक रात्री पूजाराच्या विधीत सहभागी होतात त्याला 'उंडी मेकणे' असे म्हणतात.हा विधी झाल्यानंतर सर्व लोक साक वंदणू हा विधी करतात.येथे विविध अन्नपदार्थ तयार करून ठेवलेले असतात. स्त्रिया रात्रभर मोठ-मोठ्याने रडतात.दुसऱ्या दिवशी जमलेले सर्व लोक मंडपात बसतात. तेथे मृतात्म्याच्या नावाने मोहाची दारू वाटतात त्याला 'वडाय' असे म्हणतात.वडाय झाल्यानंतर मृत व्यक्ती कशामुळे मेली याचा शोध 'पूजारा' घेत असतो त्याला 'पोडूबोलणू' असे म्हणतात.हा विधी झाल्यानंतर सर्व लोक मदतीचा हात म्हणून काही पैसे भेट म्हणून देतात.त्यानंतर गावजेवण दिले जाते.त्यानंतर उत्तरकार्याचा विधी पूर्ण होतो असे मानतात.हा विधी झाल्यानंतर पावरा लोक नातेवाईकांना दुसऱ्या दिवशी मृत व्यक्तीला काल्पनिक मानून 'पाहुणचार' दिला जातो.यावेळी कोंबडा, बकरे यांचा बळी दिला जातो.विधी न केल्यास मृत व्यक्तीचा आत्मा भटकत असतो.अशी या लोकांची श्रध्द्ा होती.

## समारोप :-

आदिवासींचा धर्म मूलतः निसर्गवादी आहे. निसर्गातल्या प्रत्येक वस्तूंत एक काही तरी शक्ती असते अशी त्यांची धार्मिक कल्पना होती.निसर्गपूजेबरोबर ते पशुपुजा व वृक्षपूजा करीत होते. आदिवासींच्या देवी-देवतांची खास अशी मंदिरे नसतात. गावाच्या बाहेर शिवारात कुठेतरी झाडा-झुडपात, मोठया झाडाखाली, रस्त्याच्या बाजूला किंवा नदी, नाल्यांच्याकाठी, टेकडीवर ही स्थाने असतात. त्याठिकाणी दगड गोटे ठेवलेले असतात.वेगवेगळया देवाची वेगवेगळी ठिकाणे असतात.तेथे त्याची स्थापना केलेली असते.'वाघदेव' हा सातपुडयातील आदिवासींचा मुख्य देव असून ते त्याची पूजा करतात.याहामोगी मातेला ते कुलदैवत मानतात.ग्रामदेवतेच्या पूजेबरोबर ते पिंपड, वड, उंबर, बेल, कदंब, शमीवृक्षांची पूजा करतात. त्यांची मंदिरे नसतात मात्र ओबड-धोबड दगडी गोटे यांना मूर्तीमानून ते त्याची पूजा करतात.देवदेवतांना संतुष्ट करण्यासाठी या लोकांत पशू-पक्ष्यांची 'बळी' देण्याची प्रथा आढळते. आत्मा व पुनर्जन्म या गोष्टीत सातपुडयातील आदिवासी जमातींमध्ये कमालीचा विश्वास असतो.एकंदरीत आदिवासींचे धार्मिक जीवन निसर्गचक्रानुसार बदलते असून त्याना इतर धर्माची कल्पना नाही.त्यामुळे निसर्गाची पूजा करणारे लोक अशी सातपुडयातील आदिवासींच्या धार्मिक जीवनाबाबत म्हणता येते. आजही आधुनिक देवमोगरा येथे याहामोगी मातेचे मंदिर अपवाद वगळता हे लोक निसर्गाची पूजा करतांना आढळतात.

१)गावीत, पुष्पा यशवंत (२०११) पश्चिम खानदेशातील आदिवासी लोकसाहित्य, प्रशांत पब्लिकेशन्स, जळगांव, पृ.१४४

२)पाटील, भी.ना (२००५) खानदेशातील समाजप्रबोधनाची चळवळ (१९००-१९५०) प्रकाशक भूषण भीमराव पाटील, पाचोरा, पृ.२३६

३)पाटील, डी.जी. (१९९८) पावरा समाज व संस्कृती, भाषा संशोधन प्रकाशन केंद्र, बडोदा, पृ.८९

४) **डोंगरसिंग लेह-या पावरा**-(२०१८)-"खानदेश परिसरातील सातपुडा पर्वतरांगामधील आदिवासींचा सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक इतिहास"(१८१८-१९०५) , **अप्रकाशित पीएच.डी.शोधप्रबंध,कबचौउमवि,जळगाव,पृ.२९९**

५) उपरोक्त,पृ.३००

६) उपरोक्त,पृ.३०१

७) उपरोक्त,पृ.३०३

८)गारे, गोविंद (१९९७) सातपुड्यातील भिल्ल : ऐतिहासिक आणि सामाजिक मागोवा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, पृ.४२

९)जोशी, महादेवशास्त्री (१९९०) भारतीय संस्कृतीकोश खंड ९ प्रकाशक पंडित महादेवशास्त्री, कार्यवाह भारतीय संस्कृतीकोश मंडळ, पुणे, पृ.४९-५१

१०)पाटील मधुकर, पावरा डोंगरसिंग (२०१५) इंदल आदिवासी पावरा जमातीचा धार्मिक उत्सव, डी.आर.पाटील (संपा) भारतीय सण उत्सवांचे ऐतिहासिक व सांस्कृतिक महत्व, अथर्व पब्लिकेशन्स, जळगांव, पृ.१४९-१५०

११)गावीत, पुष्पा यशवंत (२००४) पश्चिम खानदेशातील भिल्लांची संस्थाने, मु.ब.शहा (संपा) खानदेशचा सांस्कृतिक इतिहास खंड १, का.स.वाणी मराठी प्रगत अध्ययन संस्था, धुळे, पृ.१९२-१९७

१२)कोडीतकर, सुरेश (२००८) आदिवासी जीवन, कथा आणि व्यथा, सुगावा प्रकाशन, पुणे, पृ.३७-३८

१३)पाटील, रमाकांत (२००५) सातपुड्याची पायवाट, सातपुडा मानव विकास संस्था, नंदुरबार, पृ.४०-४३

१४) **डोंगरसिंग लेहऱ्या पावरा**-(२०१८)-"खानदेश परिसरातील सातपुडा पर्वतरांगामधील आदिवासींचा सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक इतिहास"(१८१८-१९०५),**अप्रकाशित पीएच.डी.शोधप्रबंध,कबचौउमवि,जळगाव,पृ.३११**

१५) उपरोक्त,पृ.३१३

१६)उपरोक्त,पृ.३१५

१७) उपरोक्त,पृ.३२०

१८)मुकणे, हेमलता (२०१२) वारली समाजाच्या श्रध्दा, समजूती, फड शत्रुघ्न (संपा) आदिवासी साहित्य आणि लोककला, केळकर सुशिल, वर्तक महाविद्यालय, वसई-ठाणे, पृ.१५३

१९)कुलकर्णी, शौनक (२००७) संस्कृती : निसर्ग आणि जीवनशैली, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, पृ.६२



डॉ. विवेकानंद लक्ष्मण चव्हाण
इतिहास–विभाग , एस.पी.डी.एम.महाविद्यालय,शिरपूरजि.धूळे